नि.फौ.प्र.क्र./३६/२०१८

सरकार–वि– मिथुन

नि.क्र. ५१

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ०५

मी शपथेवर खरे सांगतो की,

नावः – पंकज अमर जगीया, वय ३९ वर्ष,

कामधंदा –हॉटेल, रा. सिव्हील वॉर्ड साकोली, तह. साकोली, जि. भंडारा.

**साक्षीदाराचा सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी अधिवक्ता श्री. तौसिफ खान यांच्यामार्फत**

घटना दिनांक १५/०६/२०१८ रोजी रात्री ०९.३० ते १०.०० वाजताच्या दरम्यान गढकुंभली रस्त्यावर घडली होती. मी त्यावेळी माझ्या स्वीफ्ट डिझायर चारचाकीने माझ्या लॉजवरुन वाईन शॉपकडे जात होतो. काही लोक सिल्वर रंगाच्या रेनॉल्ट गाडीचा पाठलाग करत होते. त्यांनी मला गाडी समोर येऊन गाडी थांबवुन रेनॉल्ट गाडीचा पाठलाग करण्यास सांगितले. राऊत आणि मिथुन शेंडे आणखी एक जण गढकुंभली रस्त्यावरुन बसस्टॉप पर्यंत पाठलाग केला. रेनॉल्ट गाडी ही डॉ. नितीन गुप्ता यांच्या मालकीची होती. त्यानंतर मी ११.०० वाजता काठीयावाड धाब्यावर जेवण करण्याकरीता गेलो असता तिथे माझा चुलत भावाने सांगितले की, डॉ. गुप्ता यांना आरोपींनी दगड मारले होते व गाडीचे काच फोडले. माझ्या गाडीत बसलेल्या दोघांना मी ओळखु शकतो.

सरतपास समाप्त.

**उलटतपास आरोपी तर्फे अधिवक्ता श्री. पी. डब्ल्यु. खोब्रागडे यांच्या मार्फत सुरुः–**.

२. हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष पाहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणत्याही गाडीचा पाठलाग केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी काठीवाड धाब्यावर गेल्याचे व माझ्या चुलत भावाने सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींसोबत पटत नसल्यामुळे मी त्यांच्याविरुद्ध खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास समाप्त

**फेरतपास काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत.

VISHAL MAHANAND GAIKWAD

Digitally signed by VISHAL MAHANAND GAIKWAD
Date: 2025.06.06 16:21:22 +0530

(वि. म. गायकवाड)

०६/०६/२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, साकोली